2nd August, 2021

(1) BSE Ltd
Listing Department
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai 400 001

Scrip Code: 500087

(2) National Stock Exchange of India Ltd
Listing Department
Exchange Plaza, 5th floor,
Plot no. C/1, G Block,
Bandra Kurla Complex,
Bandra (East), Mumbai - 400 051

Scrip Code: CIPLA EQ

(3) SOCIETE DE LA BOURSE DE LUXEMBOURG
Societe Anonyme
35A Boulevard Joseph II,
L-1840 Luxembourg

Dear Sir / Madam,

Sub: <u>Newspaper Advertisement of Notice of 85th Annual General Meeting (AGM) and E-voting Information</u>

Pursuant to Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are enclosing herewith copies of newspaper advertisements published in Business Standard (English) and Sakal (Marathi) today i.e. 2nd August, 2021 which includes the following information:

1. Intimation of 85th AGM of our Company to be held on Wednesday, 25th August, 2021, at 3.00 p.m. IST through video conferencing (VC) / other audio-visual means (OAVM) and completion of email dissemination on 1st August, 2021 of the Notice of AGM and Annual Report for financial year 2020-21 to the members whose email IDs are registered with the Company.
2. Particulars regarding the facility of remote e-voting provided to Shareholders of the Company, to enable them to cast their votes on the resolutions proposed to be passed at the AGM.

With regard to the enclosed notice published in Business Standard (English) today, the year mentioned under the head of "End of remote e-voting" inadvertently got published as 2020 instead of 2021. The statement with the corrected date be read as "End of remote e-Voting - Tuesday, 24th August, 2021 (upto 5:00 pm IST)".

This is for your information and records.

Kindly acknowledge the receipt.

Thanking you,

Yours faithfully,
For Cipla Limited
RAJENDRA KUMAR CHOPRA
Digitally signed by RAJENDRA KUMAR CHOPRA
Date: 2021.08.02 23:55:07 +05'30'
Rajendra Chopra
Company Secretary

Encl: a/a

Prepared by: Raviraj Soni

629K homes stuck in top 7 cities, NCR's share 52%: Report

RAGHAVENDRA KAMATH
Mumbai, 1 August

About 629,000 residential units are substantially delayed or completely stalled in top seven cities, says a new report.

At least 71 per cent of these delayed units fall within the ₹80-lakh price bracket, 18 per cent in the premium segment, and 11 per cent in the luxury category, says the report by Anarock Property Consultants. Launched in 2014 or earlier, the total value of the currently stuck/delayed housing stock exceeds ₹5.05 trillion. Nearly 28 per cent (about 173,730) of these units are completely stalled, the report said.

The National Capital Region (NCR) has overtaken the Mumbai Metropolitan Region (MMR) with a 52 per cent share of the stuck/delayed stock, the highest in the top 7 cities with a value of ₹2.49 trillion, it said. MMR reduced its overall share with several projects getting completed in the last year. Currently, it has 28 per cent of the total affected stock with a value of ₹1,52,105 crore, Anaorck said. Pune, the other major western market, has an 8 per cent share of stuck/delayed units with a value of ₹29,390 crore, it said.

In southern cities, housing projects are mostly on track. Hyderabad, Bengaluru, and Chennai together have just 11 per cent of the total delayed/stuck units, with Chennai comprising a mere 2 per cent. The approximate value of delayed/stuck projects in these three cities is ₹56,420 crore. Kolkata has a 5 per cent share valued at ₹17,960 crore.

Prashant Thakur, director & head of research at Anarock Property Consultants, said: "For the 2019-end tally of 576,000 units, we considered projects launched in 2013 or before. Now, more than one and half years later, we have included projects launched in 2014 as well. Thus, there is a rise in the numbers — as of H1 2021-end, we have nearly 629,000 units that are yet to be completed across the 7 cities."

"There are many possible reasons, including Covid-19, funding issues, and litigation," he said.

TOTAL VALUE EXCEEDS ₹5.05 TRN



Source: Anarock

Dalmia Bharat lists plans to arrest cost inflation

ADITI DIVEKAR
Mumbai, 1 August

Amid rising diesel prices, Dalmia Bharat has chalked out a three-pronged strategy to curtail its variable costs by 15 per cent and hopes that a demand pick-up in the coming quarters would allow it to pass on some of the cost to the consumer.

"There is cost inflation since diesel prices are at an all-time high. We are investing in solar power and waste recovery systems to bring down the power costs. We are also looking to deploy electric trucks both at the mines and logistics usage to lower usage of diesel," Puneet Dalmia, managing director at Dalmia Bharat, said. "Thirdly, we look to increase usage of alternative fuel to 25 per cent from 9 per cent at present to insulate ourselves from rising diesel prices," he said.

During the April-June quarter, the company's power and fuel cost had more than doubled to ₹517 crore from ₹251 crore in the corresponding period last year. "With all this effort, we should be able to bring down our variable cost by 10-15 per cent. Part benefits of these efforts should be visible this year. Balance projects will get commissioned by June-July of 2022, so the remaining part will come next year."

Managing Director Puneet Dalmia says the firm plans to take capacity to 60 mt via organic growth route

Dalmia is hopeful that a pick-up in demand for cement in the coming quarters would allow passing on of the increased input cost to its customers. "Demand was fine in April, but it took a big hit in May and June. In July, it is in recovery mode. But this is a monsoon quarter, which is seasonally weak. Due to mini lockdowns in the past few months, some pent-up demand would come back in a roaring fashion. We are cautiously optimistic."

According to data from CRISIL Research, cement production in April-May stood at 53,613 kilo tonne against 57,722 kilo tonne in the year-ago period. While April 2021 cement production was in line with pre-Covid levels, May output took a beating. Despite the ongoing demand blips due to the pandemic, Dalmia Bharat with a capacity of 30.5 million tonnes (mt) capacity remains bullish for the sector on a long-term basis owing to strong infrastructure growth potential.

The company is looking to take the existing capacity to 48.5 mt in the next three years, which will need funding of ₹9,000 crore. This, the company plans to arrange largely via internal accruals. The next target is to take the capacity from 46.5 mt to 60 mt, "with which we will enter newer markets such as central and northern regionsy", said Dalmia. "Our capacity expansion will largely be via an organic growth route as we do not see many acquisition opportunities in the domestic market."

Hitachi says India ops to drive its growth globally

Japanese conglomerate Hitachi is "imagining" India as a global hub in terms of new age technologies and solutions which will drive its businesses in the country as well as global markets, a top company official has said.

The company, which has augmented its capacities through a concerted approach in India, is looking at the country to be a hub in new segments, including technology, AI, energy storage and fast charging, according to Hitachi India Managing Director Bharat Kaushal. PTI

Sterlite Power hires two banks for IPO

Sterlite Power Transmission, controlled by billionaire Anil Agarwal, has hired JM Financial and Axis Capital for a planned initial public offering (IPO), according to people with knowledge of the matter.

The firm, part of the Vedanta group, plans to raise about ₹3,000 crore in the financial year through March, the people said, asking not to be identified as the details are private. A prospectus is expected to be filed by September, they added.

The IPO will mainly consist of new shares, and more bankers may be added as plans progress, one of the people said. Emails to Sterlite Power, Axis Capital, and JM Financial weren't answered outside of business hours on Sunday. BLOOMBERG

सकाळ
अर्थविश्व
मुंबई, सोमवार, २ ऑगस्ट २०२१ । ९

स्टेट बँक ऑफ इंडियाकडून ३१ ऑगस्टपर्यंत गृहकर्जावरील प्रक्रिया शुल्क माफ

देशभरात पेटीएम २० हजार विक्री प्रतिनिधींची नव्याने नियुक्ती करणार

USD 1$ ₹74.38
EURO 1€ ₹88.27
POUND 1£ : ₹103.42

मुंबईतील इंधन दर
पेट्रोल 107.83
डिझेल 97.45

सराफ बाजार
सोने : ₹47,875 (२४ कॅरेट प्रति १० ग्रॅम)
चांदी : ₹67,885 (प्रति १ किलो)
इंडी : 483

एस्सार समूहाने वरळीतील १८५ कोटींची मालमत्ता गुजरातच्या व्यावसायिकाला विकली

कोविड निर्बंधामुळे अमेरिका प्रशासनाकडून अनेक भारतीय विद्यार्थ्यांची विमान तिकिटे रद्द करण्यात येत आहे

गेल्या वर्षीच्या तुलनेत टाटा मोटर्सच्या विक्रीत जुलैमध्ये ९२ टक्के वाढ

एप्रिल ते जुलैदरम्यान १२ कंपन्यांची आयपीओद्वारे २७ हजार कोटींची कमाई

हॉलमार्क सक्तीबाबत लवकरच बैठक

मुंबई, ता. १ : हॉलमार्किंग व 'एचयूआयडी'च्या सक्तीमुळे दागिने व्यावसायिकांची अडचण होत आहे. त्यामुळे केंद्रीय ग्राहक कल्याण खात्याचे मंत्री पियूष गोयल लवकरच व्यावसायिक व संबंधित सरकारी अधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत.

भारतात दर वर्षी नऊशे टन सोने वा सोन्याचे दागिने आयात होत असून ही उलाढाल जवळपास साडेचार लाख कोटी रुपयांपर्यंत आहे. आधीच पाच कोटी रुपयांचे दागिने व नवे बारा कोटी रुपयांचे दागिने हॉलमार्किंगसाठी रांगेत आहेत. हे काम होण्यास किमान एक वर्ष लागेल, असा अंदाज आहे. त्यामुळे सणासुदीच्या दिवसात व्यावसायिकांची अडचण होईल, असे ऑल इंडिया जेम्स अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिलचे संचालक दिनेश जैन यांनी सांगितले आहे.

जुलैमध्ये एक लाख १६ हजार कोटींची वसुली; केंद्राला दिलासा
जीएसटी वसुलीची गाडी रुळावर

सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. १ : जून महिन्यात जीएसटी वसुलीची घसरलेली गाडी पुन्हा रुळावर येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. जुलै महिन्यात एक लाख १६ हजार ३९३ कोटी रुपये जीएसटी वसूल झाल्याने केंद्र सरकारला हायसे वाटले आहे.

अर्थ मंत्रालयाने जुलै महिन्यातील जीएसटी वसुली संदर्भात आज जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार २२ हजार १९७ कोटी रुपये केंद्रीय जीएसटी, २८ हजार ५४१ रुपये राज्य जीएसटी, तर आंतरराज्य मालवाहतुकीवर आकारल्या जाणाऱ्या आयजीएसटी पोटी ५७ हजार ८६४ कोटी रुपये वसूल झाले आहेत. यामध्ये आयात मालावरील आकारल्या गेलेल्या २७ हजार ९०० कोटी रुपये कराचा आणि ७७९० कोटी रुपये उपकराचा समावेश आहे.

केंद्र सरकारला मे महिन्यात जीएसटीपोटी १,०२,७०९ कोटी रुपये मिळाले होते. तर एप्रिलमध्ये १,४१,३८४ कोटींची विक्रमी महसूल प्राप्ती झाली होती. त्याआधी मार्चमध्ये १२३९०२ कोटी रुपये, फेब्रुवारीमध्ये १,१३,१४३ कोटी रुपये, जानेवारीमध्ये १,१९,८७५ कोटी रुपये आणि डिसेंबर २०२० मध्ये १,१५,१७४ कोटी रुपये जीएसटी वसुली झाली होती.

अर्थव्यवस्थेत सुधारणा

जून महिन्यात जीएसटी वसुलीत मोठ्या प्रमाणात घट झाली होती. कोरोना संकटाच्या सर्वत्र असलेल्या लॉकडाउन सदृश परिस्थितीमुळे जून महिन्यात ९२ हजार ८४९ कोटी रुपये एवढेच जीएसटी वसुली झाली. मागील आठ महिन्यांत जीएसटी वसुलीने एक लाख कोटींचा आकडा पार केला असताना जून महिन्यात झालेली घट अस्वस्थता वाढविणारी होती. असे असताना जुलैमधील जीएसटी वसुली अर्थव्यवस्थेतील सुधारणा दर्शविणारी असल्याचेही अर्थ मंत्रालयाचे म्हणणे आहे.

सहकारी संस्थांच्या सभा ऑनलाईनच

पुणे, ता. १ : कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे ५० पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा ऑनलाइन किंवा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात याव्यात. तर, ५० पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी संस्थांनी वार्षिक सभेचे आयोजन मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करून सभासदांच्या प्रत्यक्ष सहभागाद्वारे करावे, असे आदेश सहकार विभागाने जारी केले आहेत.

प्रत्येक सहकारी संस्थेने वित्तीय वर्ष संपल्यापासून चार महिन्यांच्या कालावधीत लेखापरीक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच, वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांत वार्षिक सभा बोलावण्याची तरतूद आहे. परंतु राज्यात कोरोनाच्या संसर्गामुळे ५० पेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास बंदी आहे. त्यामुळे २०२०-२१ मधील वार्षिक सर्वसाधारण सभा कशा घ्याव्यात, याबाबत सहकारी संस्थांमध्ये संभ्रमावस्था होती. या पार्श्वभूमीवर सहकार विभागाने शुक्रवारी (ता. ३०) आदेश जारी केले आहेत. त्यानुसार ५० पेक्षा जास्त सभासद असलेल्या संस्थांनी व्हीसीद्वारे सभा घ्यावी.

उपस्थितीची नोंद ठेवणे आवश्यक

सहकारी संस्थेने व्यक्तीच्या किंवा एजन्सीमार्फत सभेचे कामकाज पार पाडावे. वार्षिक सभेतील सदस्यांच्या उपस्थितीची नोंद ठेवण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील, असेही या आदेशात म्हटले आहे.

ग्राहक इलेक्ट्रिक वाहनांच्या शोधात
इंधनदरवाढीमुळे इंटरनेट सर्चमध्ये २२४ टक्क्यांनी वाढ

मुंबई, ता. १ : कोरोनामुळे लागू करण्यात आलेल्या निर्बंधांमध्ये शिथिलता आणल्यानंतर स्वतःसाठी दर्जेदार चारचाकी वाहन शोधण्यासाठी इंटरनेटवरील सर्चमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत ५५ टक्के वाढ झाली आहे. त्याहून इंधनाचे दर आभाळाला भिडल्यामुळे प्रवाशांनी इलेक्ट्रिक मोटारी शोधण्यात जास्त रस दाखवला आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या शोधात या वर्षी तब्बल २२४ टक्के वाढ झाली आहे.

मोटारींची माहिती देणारी वेगवेगळी पोर्टल हाताळणाऱ्या कार देखो या टेकफर्मने नुकत्याच सादर केलेल्या अहवालात ही बाब नमूद केली आहे. मागील वर्षीच्या एप्रिल ते जून या तिमाहीच्या तुलनेत या वर्षीच्या एप्रिल ते जून या तिमाहीतील कार सर्चमध्ये मोठी वाढ झाल्याचे अहवालात म्हटले आहे. ॲटोमॅटिक प्रकारच्या मोटारी तसेच एसयूव्ही यांनाही मोठ्या प्रमाणात सर्च करण्यात आले. या वर्षी एप्रिल ते जूनदरम्यान २२.७ कोटी वेळा मोटारीसाठी सर्च करण्यात आले आहे.

ज्येष्ठांचे प्राधान्य

कोरोनाच्या भीतीमुळे ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित प्रवासाची गरज सर्वात जास्त वाटू लागल्याने त्यांनी स्वतसाठी चांगली मोटार शोधण्यास प्राधान्य दिले. ४५ ते ५४ वयोगटातील नागरिकांच्या शोधात २०९ टक्के; तर ५५ ते ६४ वयोगटातील लोकांच्या मोटार शोधात १७० टक्के वाढ झाली. सर्वात जास्त वाढ ६५ वयापुढील नागरिकांच्या गटात २४५ टक्के झाली आहे.

पेट्रोलच्या मागणीत वाढ
निर्बंधांनंतर प्रथमच कोविडपूर्व काळाएवढा वापर

नवी दिल्ली, ता. १ (पीटीआय) : देशभरात जुलैमध्ये पेट्रोलच्या मागणीत मोठी वाढ झाली असून पेट्रोलचा वापर आता जवळपास कोविडपूर्व स्तरापर्यंत पोहोचला आहे.

सरकारी मालकीच्या इंधन विक्रेत्यांनी जुलैमध्ये २.३७ मिलियन टन पेट्रोलची विक्री केली. गेल्या वर्षीच्या तुलनेत हे प्रमाण १७ टक्क्यांनी जास्त आहे. जुलै २०१९ मध्ये हेच प्रमाण २.३९ मिलियन टन एवढे होते. देशात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या डिझेलच्या विक्रीतही गेल्या वर्षीच्या तुलनेत १२.३६ टक्क्यांनी वाढ झाली. यंदा जुलैमध्ये ५.४५ मिलियन टन डिझेलची देशभरात विक्री झाली; मात्र जुलै २०१९ च्या तुलनेत हे प्रमाण अजूनही १०.९ टक्क्यांनी कमी आहे. मे महिन्यात कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे अनेक राज्यांत कठोर निर्बंध लादण्यात आले होते.

जूनपासून त्यामध्ये शिथिलता येत असल्याने व्यवहार पुन्हा पूर्वपदावर येत आहेत. त्यामुळे पेट्रोलची मागणी वाढत आहे; मात्र औद्योगिक व्यवहार अजूनही पूर्णपणे पूर्वपदावर न आल्याने डिझेलचा वापरात अपेक्षित वाढ झालेली नाही.

'रुपी'चे विलीनीकरण की खासगीकरण?
लोकसभेतील चर्चेनंतर ठेवीदारांमध्ये उत्सुकता

अनिल सावळे : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १ : आठ वर्षांपासून मुदतवाढीच्या फेऱ्यात अडकलेल्या रुपी को-ऑप. बँकेचे विलीनीकरण होणार की खासगीकरण, अशी चर्चा सध्या सुरू आहे. तथापि बँकेच्या पाच लाख ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी केंद्रीय अर्थ मंत्रालय आणि रिझर्व्ह बँकेने धोरणात्मक निर्णय घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी ठेवीदारांकडून केली जात आहे.

रुपी बँकेच्या प्रशासकीय मंडळाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत विलीनीकरण करण्याबाबत रिझर्व्ह बँकेकडे संयुक्त प्रस्ताव दिला होता. त्यावर निर्णय घेतला नसला, तरी तो नाकारण्यातही आलेला नाही. दुसरीकडे रुपी बँकेच्या प्रशासकीय मंडळाने २०१८ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये विलीनीकरणाबाबत प्रस्ताव दिला होता. त्यावेळी रिझर्व्ह बँकेने गांभीर्याने दखल घेतली नव्हती. खासदार गिरीश बापट यांनी 'रुपी'चे बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये विलीनीकरणाची मागणी नुकतीच लोकसभेत केली. त्यामुळे रुपीचे कोणत्या बँकेत विलीनीकरण होणार, असा प्रश्न ठेवीदारांना पडला आहे.

रुपी बँकेची मार्चअखेरची स्थिती

१२९६ कोटी ७३ लाख
ठेवी

२९४ कोटी १५ लाख
कर्जे

३७१ कोटी
हार्डशिप योजनेंतर्गत दिलेली रक्कम

३०० कोटी
गेल्या आठ वर्षांत कर्जवसुली

(आकडे रुपयांत)

रुपी बँकेचे सहकारी बँकेत विलीनीकरण करण्याबाबत रिझर्व्ह बँकेने पुढाकार घेणे आवश्यक आहे. खासगीकरण करण्यासही विरोध नाही. ते शक्य नसल्यास रिझर्व्ह बँकेने रुपी बँकेला पुन्हा बँकिंग परवाना देऊन बँक सुरू करण्यास परवानगी द्यावी.
- सुधीर पंडित,
प्रशासक, रुपी को-ऑप. बँक

करिअरला दिशा देणारा ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट
एक वर्षाचा पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्रॅम; आठव्या बॅचसाठी प्रवेश सुरू

पुणे, ता. १ : 'सकाळ माध्यम समुहा'च्या 'सिमॅसेस लर्निंग एलएलपी' (एसआयआयएलसी) आणि 'ॲग्रोवन'तर्फे कृषी क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठी करिअरला योग्य दिशा देणारा ६० टक्के प्रात्यक्षिकावर आधारित 'ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट' (एबीएम) या एक वर्षाच्या फूल टाइम पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्रॅमच्या आठव्या बॅचसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

SIILC
Transforming Human Capital

दोन सेमिस्टरमध्ये होणाऱ्या या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना वारंवार नामांकित इंडस्ट्री तज्ज्ञांसोबत संवादाची संधी मिळून इंडस्ट्रींच्या गरजेनुसार स्वतःला विकसित करण्याचे शिक्षण दिले जाते. दुसरी महत्त्वाची बाब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता-घेता चार ते सहा महिने ऑन द जॉब ट्रेनिंगसाठी थेट इंडस्ट्रींमध्ये पाठविले जाते. ज्यातून त्यांना फिल्डवरील कामाचा अनुभव मिळतो, ज्याचा फायदा त्यांना करिअरची यशस्वी सुरुवात करण्यासाठी होतो.

या अभ्यासक्रमात गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्जाची तरतूद असून विद्यार्थी पात्रतेनुसार एकूण शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के रक्कम केवळ अल्पदराने शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. कृषी क्षेत्रात व्यवसाय वा नोकरी करू इच्छिणारे, कोणत्याही क्षेत्रात पदवी घेतलेले पदवीधर अर्ज करू शकतात.

'एबीएम'मुळे मला ॲग्री इंडस्ट्रीच्या गरजेनुसार स्वतःला विकसित करण्याचे मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे 'मेरा किसान' कंपनीत 'ऑन द जॉब ट्रेनिंग'ची संधी मिळून इंडस्ट्रिअल सप्लाय चेनचा अनुभव घेत आहे.
- प्राजक्ता पुसदकर,
विद्यार्थिनी (बॅच २०२०-२१)

ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट हा इंडस्ट्री व विद्यार्थ्यांमधील पोकळी भरून काढणारा अभ्यासक्रम आहे. अशा अभ्यासक्रमाचा इंडस्ट्रींना सुद्धा फायदा होऊन अपेक्षेप्रमाणे कुशल उमेदवार मिळतात.
- सुषमा कोळवणकर,
संस्थापक संचालक, ग्लोबल फॉर्च्युन मिशन इंडिया प्रा. लि.

अधिक माहितीसाठी
संपर्क क्रमांक : ९८८१०९९७५७,
एसआयआयएलसी, सकाळनगर, गेट नं. १,
बाणेर रोड, पुणे
संकेतस्थळ : www.siilc.edu.in